भारतइतिहाससंशोधक मंडळ-- पुरस्कृतग्रंथमाला
क्रमांक ५६.

# हिंदी शिल्पशास्त्र

## भाग पहिला

लेखक:
कृष्णाजी विनायक वझे,

शके १८५०

किंमत तीन रुपये

भारतइतिहाससंशोधक मंडळ—पुरस्कृतग्रंथमाला
क्रमांक ५ वा.

# हिंदी शिल्पशास्त्र

## भाग पहिला

---

## प्रस्तावनाखंड—सामान्य माहिती

---

लेखक
कृष्णाजी विनायक वझे,
नाशिक शहर.

---

प्रकाशक
धोंडो कृष्ण साठे, बी. एस्‌सी. बी. ए.
लोहभांडारम्, रविवार, पुणें.

---

[ ग्रंथकर्त्यांनें हक्क राखून ठेविले नाहींत. ]

शके १८५० ] किंमत तीन रुपये [ सन १९२८

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें
व
रा. धों. रु. साठे, यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

---

ग्रंथ मिळण्याचें ठिकाणः—भा. इ. सं. मंडळ ३१४ सदाशिव पेठ, पुणें.

# पुरस्कार

नाशिकचे सुप्रसिद्ध शिल्पज्ञ रावसाहेब कृष्णाजीपंत वझे यांनीं प्राचीन भारतीय शिल्पाचा व्यासंग बहुत परिश्रमानें, एकनिष्ठेनें व शांतपणें सतत तीस वर्षांवर केलेला आहे. आणि आतां आपल्या परिणतप्रज्ञेचें मधुर फल ते आपल्या देशास निरपेक्ष बुद्धीनें देत आहेत हा त्यांचा जिज्ञासु जनांवर मोठाच उपकार आहे. पुणें शहरांत **भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे** व्याख्यानमालेंत ज्या वेळीं रा. वझे यांनीं एक शिल्पव्याख्यानमाला मंडळाचे विनंतीवरून गुंफिली त्यावेळीं भारतीय शिल्पाची प्रगति, शास्त्र व कला या दोनही दृष्टींनीं परम रमणीय व अभिमानावह झालेली आहे, असा प्रो. शं. रा. भागवतप्रभृति नूतन-शिल्पज्ञांनींही अभिप्राय दर्शविला व मंडळानें रा. वझे यांच्या ज्ञानाचा लाभ ग्रंथरूपानें जनतेस करविण्याचें श्रेय घ्यावें असें साग्रह व सोत्सुक प्रतिपादन केलें. परंतु मंडळास आर्थिक प्रतिकूलता सांप्रत विशेष जाणवत असल्यामुळें प्रकाशनाचा भार प्रत्यक्ष शिरावर न घेतां मंडळाकडून त्याचा पुरस्कार यथाशक्ति करण्याविषयीं प्रयत्न झाले. पुण्यांतील कित्येक शिल्पव्यवसायी हितचिंतकांस मंडळानें आपला आशय कळविला. त्याचा परिणाम म्हणजे हिंदी शिल्पशास्त्र प्रथम खंडाची प्रसिद्धी मंडळाच्या **पुरस्कृत** ग्रंथमालेंत करण्याचा योग आज येत आहे ही होय. रा. वझे यांनीं कांहीं साहाय्यकांकडून थोडें द्रव्य या कार्यासाठीं जमा केलें आहे. रा. धों. कृ. साठे यांनीं या खंडाच्या प्रकाशनव्ययाचा पडेल तेवढा भार अंगावर घेण्याचें मान्य केलें हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. प्रो. भागवत यांनीं रु. १०१ या कार्यासाठीं दिले आहेत. रा. कृष्णराव साठे यांनीं रु.१०० देण्याचें आश्वासन दिलें आहे. रा.शंभुराव दातार यांनींहि चित्रप्रकाशनाची जबाबदारी घेऊन साहाय्याचें आश्वासन दिलें आहे. आणि आतां ग्रंथप्रसिद्धीचा संकल्प सांगितला गेला तेव्हां इतर मंडळीहि आपापला भार शिरावर घेतील तर पुढील पाऊल टाकण्यास उमेद येईल.

वरील सर्व साहाय्यकांचे मनापासून आभार प्रदर्शित करण्यास मंडळास आनंद होत आहे. तसेंच प्रस्तुत ग्रंथ छापण्याचे कामीं आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं दक्षतेनें व कार्याचें महत्त्व जाणून काम केलें याविषयीं त्यांचे आभार मानिले पाहिजेत. रा. वझे यांजकडून मुद्रितांची सर्व कच्ची तपासणी होऊन येई. आणि

पुढें नमुन्याची घडी इकडून संमत होई. तथापि या शास्त्रीय ग्रंथांत राहूं नयेत अशीं अशुद्धें यात राहात आहेत असें दिसे. तेव्हां प्रो. स. वि. आपटे यांनीं मुद्रितांची तपासणी माझे विनंतीवरून केली. रा. आपटे यांचा मी फार आभारी आहे. इतकें करूनही यांत अशुद्धें बरींच उरलीं आहेत. छापखान्यांत द्यावयाची मूळ प्रतच अगदीं शुद्ध व निर्दोष अशी नवी लिहवून दिली तर ही अशुद्ध-पीडा पुष्कळ कमी होईल. असो, तसें या प्रसंगीं करतां आलें नाहीं याचें वाईट वाटतें. कसेंहि असलें तरी महाराष्ट्रांत शिल्पसंशोधनाची ही नवी शाखा रा. वझे यांनीं स्थापिली आहे आणि त्याचें प्रथम ग्रंथफल जनतेचे चरणीं अर्पण करण्याच्या पुण्यकृत्याचा पुरस्कार करण्याचा भाग्यप्रसंग मंडळास लाभत आहे याचा मंडळाचे सर्व हितचिंतकांस साहजिकच संतोष होईल.

कार्तिक शु. ११-१८४७ पुणें.

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ.

---

ता. क. सदरील ग्रंथ सर्व छापून झाल्यावर आर्यभूषण छापखान्यावर अग्निकोप होऊन त्या प्रळयांत या ग्रंथाच्या सर्व छापील घड्या जळून खाक झाल्या!! फक्त रावसाहेब वझे यांचेकडे पाठविलेल्या घड्यांची एक छापील प्रत त्यांजकडे होती! आर्यभूषणची घडी पुनः जनतेच्या सहानुभूतीनें आणि चालकांच्या चिकाटीनें बसल्यावर ह्या शिल्पग्रंथाचें मुद्रण म्हणजे धर्माचें काम; यास्तव हा नवीन आकार न घेतां पूर्वीं भरलेल्या आकारांतूनच द्यावा अशी चालकांस विनंति केली आणि रा. वामनराव पटवर्धन यांनीं त्यांच्या राष्ट्रहितदृष्टीस अनुसरून ती उदारपणानें मान्य केली याबद्दल आर्यभूषण चालकांचें ऋण या स्थळीं मुद्दाम उच्चारून त्यांचे आभार मानितों आणि हें पुनर्मुद्रणाचें फल सर्वांच्या पदरांत टाकितों. कळावें, पौष शु. १५।१८४९ पुणें.

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १६ | ज्ञानक्रियात्मका | ज्ञानक्रियात्मकः |
| ६ | १२ | त्यांच्यापासून | त्यांच्यामागून. |
| ९ | १ | रूषिजलं | रूणिर्जलं |
| १५ | १ | सीराध्याकर्षण | सीराद्याकर्षण. |
| १५ | ३ | गजाश्वस्वारश्य | गजाश्वसारथ्य. |
| १५ | ८ | जलवायवाग्निसंयोग | जलवाय्वाग्निसंयोग |
| २० | ८ | क्रियापद् | क्रियापाद् |
| २६ | २ | अभियंतृ | अभियंतु |
| २६ | २९ | हारिणाम | हारिमाण |
| २६ | २९ | हारिद्रिव | हारिद्द्रव |
| २७ | १ | क्रीडतीश्वरण | क्रीडतीश्वरत |
| २७ | २२ | शुचयाः | शुचयः |
| ३२ | ३ | अविद्युन्माद्भिः | विद्युन्माद्भिः |
| ३२ | २३ | भटकट | बळकट |
| ३६ | १५ | द्युपति | द्युपैति |
| ४१ | २० | टोले | टोळे |
| ५१ | ९ | हिरण्यवस्त्रः | हिरण्यवस्त्रैः |
| ५६ | १४ | वळेपर्यंत | वेळेपर्यंत. |
| ६३ | १२ | अनात्य | अमात्य |
|  | १७ | दृष्टी | द्रष्टि |
| ६५ | ४ | मध्यम | अधम |
|  | ११ | रज्जवः स्मृतः | रज्जवःस्मृताः |
| ६६ | १२ | दंडो | दंडौ |
| ६७ | १७ | ती गुण्या | तो गुण्या |
| ६९ | १७ | फेस्को | फ्रेस्को |
| ७१ | १२ | कष्टपूर्वो | रूष्टपूर्वो |
| ७३ | २१ | अडतीस, तीन, एकऐंसी, बेऐंशी | अडतीसतीन, एक्यायशी ब्यायशी |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
| --- | --- | --- | --- |
| ७७ | २० | पसंत | वसंत |
| ७९ | २३ | द्ब्यंगुलावर | द्ब्यंगुलावरा |
| ८६ | १५ | भ्रमणसाध्यं | भ्रमेण साध्यं |
| ८८ | १७ | हूं सं | ह्रासं |
|  | १८ | अंताशिखं | अंतःशिखं |
| १०१ | २२ | कषायां | कषाया |
| १०३ | ३ | दाक्षिणी | दाक्षिण |
| १०७ | २७ | स्फाल्येषु | स्फाल्न्येषु |
|  | २७ | पुराक्षेत्रकूर्मो | पुरा क्षेत्रकूर्मो |
| १०९ | ६ | शिखरे रत्नमंडितं | शिखरैरत्नमंडितं |
|  | २० | यथाशाक्ति | यथास्थानं |
| १३५ | १८ | संकृति | संस्कृति |
|  | १९ | संस्कृति | संकृति |
| १४२ | १३ | बलिभूर्यात् | बलिर्भूयात् |
|  | २० | खाऊं | खाऊ |